मंत्रालयीन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यामधील सहायक कक्ष अधिकाऱ्यांसाठीची सन २०१७ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा पुढे ढकलण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः सेप्रप्र २०१७/ प्र.क्र.११/का-१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २० सप्टेंबर, २०१७.

संदर्भ -

शासन परिपत्रक क्रमांकः सेप्रप-२०१७/प्र.क्र.११/का.१७, दि. २३ ऑगस्ट, २०१७

शासन परिपत्रक -

मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यामधील सहायक कक्ष अधिकाऱ्यांसाठी सन २०१७ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा दिनांक २० सप्टेंबर, २०१७ आणि २१सप्टेंबर, २०१७ (बुधवार-गुरुवार) या कालावधीत विक्रीकर भवन, ९ वा मजला, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा परीक्षा कक्ष, माझगांव, मुंबई ४०० ०१० येथे आयोजित करण्याचे दि. २३ ऑगस्ट,२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रस्तावित करण्यात आले होते.तथापि, अतिवृष्टी व अनियमित वाहतूक व्यवस्था यामुळे परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. सदर परीक्षा दि. २५ सप्टेंबर, २०१७ व २६ सप्टेंबर,२०१७ या दिवशी विक्रीकर भवन, ९ वा मजला, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा परीक्षा कक्ष, माझगांव, मुंबई ४०० ०१० येथे सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आयोजित करण्यात येईल.

२. सदर परीक्षेस बसण्यास परवानगी दिलेल्या उमेदवारांची नावे, विभाग व त्यांचे आसन क्रमांक, उमेदवारांना परीक्षेसाठी दिलेल्या महत्वाच्या सूचना, मागील वर्षातील गुणांनुसार संबंधित विषयांमध्ये सूट मिळालेल्या उमेदवारांची नावे इत्यादींबाबतची माहिती संदर्भीय शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

३. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक परीक्षेला प्रवेश दिलेल्या सर्व उमेदवारांच्या निदर्शनास आणून त्याबाबतची नोंद आपल्या विभागाच्या अभिलेखात जतन करुन ठेवावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०९२०१६५००३२३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arati Shankar Desai

Digitally signed by Arati Shankar Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef2d654ac80fbb94f45fef635ddbb5b5e9301a3a70a4f4298a52a5fd8bef5f42, serialNumber=49bc5a99b724c2018fcd117798aebf1146777ecb321b7b45309e97b033f098b8, cn=Arati Shankar Desai
Date: 2017.09.20 16:38:54 +05'30'

(आरती देसाई)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने व ईमेलव्दारे)
२. सर्व मंत्रालयीन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : सेप्रप्र २०१७/प्र.क्र.११/का-१७, दिनांक २० सप्टेंबर, २०१७ चे सहपत्र

सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१७ चे वेळापत्रक

दिनांक	वेळ	प्रश्नपत्रिका क्रमांक	विषय
१	२	३	४
सोमवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१७	सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३०	**प्रश्नपत्रिका क्र.१ (भाग-१)** गुण- ५० (पुस्तकांसह)	* महाराष्ट्र शासन कार्यनियमावली. * कार्यनियमावली अन्वये काढण्यात आलेले अनुदेश. * महाराष्ट्र विधानसभा नियम. * महाराष्ट्र विधानपरिषद नियम.
		(भाग-२) गुण- ५० (पुस्तकांसह)	* म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९. * म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९. मुंबई नागरी सेवा (वर्गीकरण व सेवाभरती) नियम.
	दुपारी ०२.३० ते सायं. ०५.३०	**प्रश्नपत्रिका क्र.२ (भाग-१)** गुण- ५० (पुस्तकांशिवाय)	शासनाच्या निरनिराळ्या विभागातील व मंत्रालयातील व जिल्हा पातळीवरील रचना. जनता, सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी संबंध. शासनाची महत्वाची धोरणे आणि कल्याणकारी उपाययोजना.
		(भाग-२) गुण- ५० (पुस्तकांशिवाय)	कार्यालयीन कार्यपध्दतीची नियमपुस्तिका,वार्षिक प्रशासन अहवाल, अत्यंत गुप्त बाबी आणि गोपनीय माहिती व कागदपत्रे याबाबत घ्यावयाची खबरदारी आणि त्यांची सुरक्षितता याबाबत नियम **(विभागीय सुरक्षाविषयक सुचनांची नियमपुस्तिका),** पुराभिलेख जतन करणे, मा.संसद सदस्य/ विधानमंडळ सदस्य यांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना.
मंगळवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०१७	सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३०	**प्रश्नपत्रिका क्र.३ (भाग-१)** गुण- ५० (पुस्तकांसह)	* महाराष्ट्र / मुंबई नागरी सेवा नियम.
		(भाग-२) गुण- ५० (पुस्तकांसह)	* अर्थसंकल्प नियमपुस्तिका. * आकस्मिक खर्च नियमपुस्तिका.
	दुपारी ०२.३० ते सायं. ०५.३०	**प्रश्नपत्रिका क्र.४** गुण- १०० (पुस्तकाशिवाय)	टिप्पणी लेखन व मसुदा लेखन.

(*) असे चिन्हांकन केलेल्या विषयांची अधिकृत शासकीय मुळ पुस्तके अथवा संबंधित विभागाच्या आस्थापना अधिकाऱ्यांनी प्रमाणित करुन दिलेल्या संबधित अधिकृत शासकीय पुस्तकांच्या झेरॉक्स प्रती परीक्षेच्या वेळी वापरण्यास परवानगी राहील.
